29 OCT 2026
तरुण भारत



कोल्हापूर : झेक प्रजासत्ताकच्या रिसर्च सेंटरचे संचालक विट डोकल यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत

झेक प्रजासत्ताक शिष्टमंडळाची शिवाजी विद्यापीठास भेट

त. भा. प्रतिनिधी,

कोल्हापूर : झेक प्रजासत्ताकच्या इंटरनॅशनल न्यूरोडिजेनेरेटिव्ह डिसऑर्डर रिसर्च सेंटरचे (आयएनडीआरसी) संचालक विट डोकल व संस्थेचे एथिक्स अँड सिक्युरिटी मॅनेजर ललित पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाला भेट देऊन संशोधनातील आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संभाव्य संधींबाबत चर्चा केली.

विट डोकल व ललित पाटील यांनी कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासमवेत त्यांनी संशोधन क्षेत्रातील परस्पर सहकार्य, भविष्यातील सहकार्याच्या संभाव्य दिशांवर विचारविनिमय केला.

पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत केले. संगणकशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. कबीर खराडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 OCT 2026
पुण्यनगरी

झेक प्रजासत्ताकच्या संशोधन शिष्टमंडळाची विद्यापीठाला भेट

कोल्हापूर : प्रतिनिधी

झेक प्रजासत्ताकच्या इंटरनॅशनल न्यूरोडिजेनेरेटिव्ह डिसऑर्डर रिसर्च सेंटरच्या प्रतिनिधींनी शिवाजी विद्यापीठाला भेट देऊन संशोधनातील आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संभाव्य संधींबाबत चर्चा केली. संशोधनातील आंतरराष्ट्रीय सहकार्य, ज्ञानाची देवाण-घेवाण आणि आंतरविद्याशाखीय समन्वयाच्या माध्यमातून संशोधनाच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठास झेक प्रजासत्ताकच्या रिसर्च सेंटरचे संचालक विट डोकल आणि संस्थेचे एथिक्स अँड सिक्युरिटी मॅनेजर ललित पाटील यांनी भेट दिली.



कोल्हापूर : झेक प्रजासत्ताक रिसर्च सेंटरचे संचालक विट डोकल यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत. सोबत डॉ. आसावरी जाधव, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि ललित पाटील.

भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासमवेत त्यांनी संशोधन क्षेत्रातील परस्पर सहकार्य, संस्थात्मक समन्वय आणि भविष्यातील सहकार्याबाबत चर्चा केली.

डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संगणकशास्त्र विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. कबीर खराडे उपस्थित होते. डॉ. सोनल चोंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 OCT 2026 तरुण भारत

उद्योग-विद्यापीठाच्या सहकार्यातून कौशल्यधारित शिक्षणाच्या संधी

- कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठाचा ग्रीन सोल्युशन्स इंडस्ट्रीजशी सामंजस्य करार

त. भा. प्रतिनिधी,



कोल्हापूर : सामंजस्य कराराच्या प्रतींचे हस्तांतर करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि सागर अहिवाळे व आरती भोसले. सोबत कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व डॉ. आसावरी जाधव.

कोल्हापूर : विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे अभिप्रेत आहे. विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनविषयक क्षमता आणि उद्योगक्षेत्रातील व्यावहारिक अनुभव यांची सांगड घातल्यास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह संशोधनालाही नवी दिशा मिळू शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ व पुणे येथील ग्रीन सोल्युशन्स इंडस्ट्रीज प्रा. लि. यांच्यात काल झालेल्या सामंजस्य करारावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, विद्यापीठ आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे ज्ञानाचे व्यावहारिक उपयोगात रूपांतर करण्याच्या संधीही वाढतील.

विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधनविषयक कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी विविध संस्था, उद्योग आणि संशोधन केंद्रांशी सहकार्य वाढविणे आवश्यक आहे.

ग्रीन सोल्युशन्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवाळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि अहिवाळे यांनी करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी डॉ. आसावरी जाधव, ग्रीन सोल्युशन्सच्या आरती भोसले आणि विद्युलता पाटील उपस्थित होत्या.

29 OCT 2026
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि ग्रीन इंडस्ट्रीज सोल्युशन्स यांच्यादरम्यान झालेल्या सामंजस्य कराराच्या प्रतींचे हस्तांतर करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि सागर अहिवाळे, आरती भोसले. यावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, आसावरी जाधव.

उद्योग-विद्यापीठ सहकार्यातून कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी

कुलगुरू कामत; 'ग्रीन सोल्युशन्स'शी करार

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : 'विद्यापीठ आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे ज्ञानाचे व्यावहारिक उपयोगात रूपांतर करण्याच्या संधी वाढतील,' अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ आणि पुणे येथील ग्रीन सोल्युशन्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात मंगळवारी झालेल्या सामंजस्य करारावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

डॉ.कामत म्हणाले, 'विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण, प्रात्यक्षिक अनुभव आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बदलत्या औद्योगिक गरजा आणि रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्राचा अनुभव मिळाल्यास त्यांची व्यावसायिक तयारी अधिक सक्षम होण्यास मदत होईल.'

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, 'विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधनविषयक कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी विविध संस्था, उद्योग आणि संशोधन केंद्रांशी सहकार्य वाढविणे आवश्यक आहे. अशा सहकार्यातून ज्ञानाची देवाणघेवाण, संशोधनाला व्यावहारिक दिशा आणि परस्पर सहकार्याच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.'

ग्रीन सोल्युशन्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवाळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. उद्योगक्षेत्रातील अनुभव आणि विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनविषयक कौशल्य यांच्या परस्परपूरक वापरातून विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाच्या आणि ज्ञानविस्ताराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात, या दृष्टीने या सहकार्याला महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि अहिवाळे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, ग्रीन सोल्युशन्सच्या आरती भोसले, विद्युलता पाटील उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 OCT 2026 पुण्यनगरी

विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण संधी देणे अभिप्रेत

कुलगुरू डॉ. राजनीश कामत; शिवाजी विद्यापीठाचा ग्रीन सोल्युशन्स इंडस्ट्रिजसमवेत सामंजस्य करार

कोल्हापूर : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे, आजच्या शिक्षण प्रणालीत अभिप्रेत आहे. विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनविषयक क्षमता आणि उद्योग क्षेत्रातील व्यावहारिक अनुभव यांची सांगड घातल्यास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह संशोधनालाही नवी दिशा मिळू शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.



शिवाजी विद्यापीठ आणि पुणे येथील ग्रीन सोल्युशन्स इंडस्ट्रिज प्रा. लि. यांच्यात काल झालेल्या सामंजस्य करारावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. डॉ. कामत म्हणाले, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण, प्रात्यक्षिक अनुभव आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तसेच, विद्यापीठ आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे ज्ञानाचे व्यावहारिक उपयोगात रूपांतर करण्याच्या संधीही वाढतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधनविषयक कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी विविध संस्था, उद्योग आणि संशोधन केंद्रांशी सहकार्य वाढवणे आवश्यक आहे. अशा सहकार्यातून ज्ञानाची देवाणघेवाण, संशोधनाला व्यावहारिक दिशा आणि परस्पर सहकार्याच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

ग्रीन सोल्युशन्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवाळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि अहिवाळे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, ग्रीन सोल्युशन्सच्या आरती भोसले आणि विद्युलता पाटील उपस्थित होत्या.

29 OCT 2026

तरुण भारत

महात्मा फुलेंची राष्ट्रकल्पना ही लोकशाहीवादी

प्रतिनिधी, कोल्हापूर

- **डॉ. सदानंद मोरे : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चचासत्र**

महात्मा जोतिराव फुले यांची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती. ब्रिटिशांच्या प्रचलित राज्यकल्पनेपेक्षा वेगळी राष्ट्रनिर्मितीची संकल्पना त्यांनी मांडली. एकमय समाज, एकमय राष्ट्र या संकल्पना महात्मा फुलेंनी मांडल्या, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.



डॉ. सदानंद मोरे

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे प्रा. डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्ययन केंद्र, आंतरभारती शिक्षण मंडळ, गांधी अभ्यास केंद्र आणि कॉ म्रेड दत्ता देशमुख अध्यासन यांच्या सहकार्याने आयोजित 'महात्मा फुलेंचे राष्ट्रउभारणीतील योगदान" या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, महात्मा फुले यांनी इंग्लंडमधील उमरावशाहीवर टीका केली होती. हंटर आयोगाच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. फुले ब्रिटिश नोकरशाहीच्या विरोधात होते. त्यामुळे फुले यांच्या राष्ट्रकल्पनेचा विचार करताना त्यांच्या लोकसत्तावादी दृष्टिकोनाचा विचार करणे आवश्यक आहे.


डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, महात्मा फुले यांना बहुजन आणि वंचितांचे स्वराज्य निर्माण करायचे होते. प्रस्थापित व्यवस्थेतील विषमता आणि अन्यायाविरोधात त्यांनी विविध वैचारिक प्रवाहांच्या माध्यमातून आवाज उठवला. कुलगुरू डॉ राजनीश कामत म्हणाले, महात्मा फुलें शिक्षण विषयक कार्य थोर आहे. स्त्री शिक्षणाची ज्योत त्यांनी अथक प्रयत्नांनी पेटवली. त्यांचे हे कार्य आपल्याला प्रेरणा देणारे आहे.

29 OCT 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महात्मा फुलेंची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती : डॉ. सदानंद मोरे



कोल्हापूर/प्रतिनिधी :

महात्मा जोतिराव फुले यांची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती. ब्रिटिशांच्या प्रचलित राज्यकल्पनेपेक्षा वेगळी राष्ट्रनिर्मितीची संकल्पना त्यांनी मांडली. एकमय समाज, एकमय राष्ट्र या संकल्पना महात्मा फुलेंनी मांडल्या, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे प्रा. डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्ययन केंद्र, आंतरभारती शिक्षण मंडळ, गांधी अभ्यास केंद्र आणि कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासन यांच्या सहकार्याने आयोजित 'महात्मा फुलेंचे राष्ट्रउभारणीतील योगदान' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषणात ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, महात्मा फुले यांनी इंग्लंडमधील उमरावशाहीवर टीका केली होती. हंटर आयोगाच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. फुले ब्रिटिश नोकरशाहीच्या विरोधात होते. त्यांची भूमिका लोकसत्तावादी होती. समाजातील जातिभेद नष्ट करूनच समताधिष्ठित राष्ट्राची उभारणी करता येईल, असा विश्वास त्यांना होता. त्यामुळे फुले यांच्या राष्ट्रकल्पनेचा विचार करताना त्यांच्या सामाजिक समता आणि लोकसत्तावादी दृष्टिकोनाचा विचार करणे आवश्यक आहे.

डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, महात्मा फुले यांना बहुजन आणि वंचितांचे स्वराज्य निर्माण करायचे होते. प्रस्थापित व्यवस्थेतील विषमता आणि अन्यायाविरोधात त्यांनी विविध वैचारिक प्रवाहांच्या माध्यमातून आवाज उठवला. त्यांच्या विचारांमधून वंचित घटकांच्या हक्कांचा आणि सामाजिक परिवर्तनाचा व्यापक दृष्टिकोन समोर येतो.

कुलगुरू डॉ राजनीश कामत म्हणाले, महात्मा फुलें शिक्षण विषयक कार्य थोर आहे. स्त्री शिक्षणाची ज्योत त्यांनी अथक प्रयत्नांनी पेटवली. सर्व सामान्यांना शिक्षण मिळाले तर राष्ट्र उभारणी होईल, अशी धारणा फुलेंची होती. त्याचे हे कार्य आपल्याला प्रेरणा देणारे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 OCT 2026

वर्तमान

महात्मा फुलेंची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती : डॉ. सदानंद मोरे

कोल्हापूर/प्रतिनिधी :


महात्मा जोतिराव फुले यांची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती. ब्रिटिशांच्या प्रचलित राज्यकल्पनेपेक्षा वेगळी राष्ट्रनिर्मितीची संकल्पना त्यांनी मांडली. एकमय समाज, एकमय राष्ट्र या संकल्पना महात्मा फुलेंनी मांडल्या, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे प्रा. डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्ययन केंद्र, आंतरभारती शिक्षण मंडळ, गांधी अभ्यास केंद्र आणि कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासन यांच्या सहकार्याने आयोजित 'महात्मा फुलेंचे राष्ट्रउभारणीतील योगदान' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषणात ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, महात्मा फुले यांनी इंग्लंडमधील उमरावशाहीवर टीका केली होती. हंटर आयोगाच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. फुले ब्रिटिश नोकरशाहीच्या विरोधात होते. त्यांची भूमिका लोकसत्तावादी होती. समाजातील जातिभेद नष्ट करूनच समताधिष्ठित राष्ट्राची उभारणी करता येईल, असा विश्वास त्यांना होता. त्यामुळे फुले यांच्या राष्ट्रकल्पनेचा विचार करताना त्यांच्या सामाजिक समता आणि लोकसत्तावादी दृष्टिकोनाचा विचार करणे आवश्यक आहे.

डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, महात्मा फुले यांना बहुजन आणि वंचितांचे स्वराज्य निर्माण करायचे होते. प्रस्थापित व्यवस्थेतील विषमता आणि अन्यायाविरोधात त्यांनी विविध वैचारिक प्रवाहांच्या माध्यमातून आवाज उठवला. त्यांच्या विचारांमधून वंचित घटकांच्या हक्कांचा आणि सामाजिक परिवर्तनाचा व्यापक दृष्टिकोन समोर येतो.

कुलगुरू डॉ राजनीश कामत म्हणाले, महात्मा फुलें शिक्षण विषयक कार्य थोर आहे. स्त्री शिक्षणाची ज्योत त्यांनी अथक प्रयत्नांनी पेटवली. सर्व सामान्यांना शिक्षण मिळाले तर राष्ट्र उभारणी होईल, अशी धारणा फुलेंची होती. त्याचे हे कार्य आपल्याला प्रेरणा देणारे आहे.



29 OCT 2026

वर्तमान

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

समकालीन प्रश्नांच्या संदर्भात महात्मा फुलेंचा विचार उपयुक्त : डॉ. अभय टिळक



कोल्हापूर/प्रतिनिधी :

सार्वजनिक कल्याणकारी राज्यव्यवस्था असावी, शासनाने कररूपाने जमा केलेल्या निधीचा विनियोग वंचित घटकांच्या कल्याणासाठी करावा, अशी महात्मा जोतिराव फुले यांची भूमिका होती. सिंचन, शेती आणि शिक्षणासारख्या प्रश्नांबाबत फुले यांचे विचार आजही प्रस्तुत असून, समकालीन प्रश्नांच्या संदर्भात महात्मा फुलेंचा विचार उपयुक्त आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित महात्मा फुले स्मृती व्याख्यानमालेत 'महात्मा फुले, सार्वजनिक कल्याण आणि शासनव्यवस्था' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे होते.

डॉ. टिळक म्हणाले, शासनाने जमा केलेल्या कराचा योग्य विनियोग करून समाजातील वंचित घटकांच्या गरजांना प्राधान्य दिले पाहिजे. साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप आणि सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने शासनाची भूमिका महत्त्वाची आहे. शेती, सिंचन आणि शिक्षण या क्षेत्रांतील प्रश्नांचा विचार करताना महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता लक्षात घेणे आवश्यक आहे.

समाजातील ज्या घटकांमध्ये पहिली पिढी शिक्षण घेण्यासाठी पुढे येत असते, त्या घटकांना शासनव्यवस्थेने विशेष बळ देण्याची गरज असते, असे फुले यांचे मत होते. उच्चशिक्षणाच्या माध्यमातून वंचित घटकांना योग्य संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने सकारात्मक हस्तक्षेप करावा, अशी त्यांची भूमिका होती. नोकरशाहीनेही शासनाच्या कल्याणकारी धोरणांची अंमलबजावणी करताना वंचितांच्या हिताला प्राधान्य द्यावे, असे फुले यांच्या विचारांतून स्पष्ट होते.

महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा विचार केवळ ऐतिहासिक संदर्भात न करता, आजच्या सार्वजनिक धोरणांच्या आणि शासनव्यवस्थेच्या संदर्भातही केला पाहिजे. त्यांच्या विचारांचा समकालीन प्रश्नांशी संबंध जोडून अभ्यास केल्यास सामाजिक न्याय आणि कल्याणकारी राज्याच्या संकल्पना अधिक व्यापकपणे समजून घेता येतील, असेही डॉ. टिळक यांनी नमूद केले.

यावेळी साहित्यिक राजन गवस, डॉ.अवनिश पाटील, डॉ.प्रकाश पवार, डॉ.भारती पाटील, पल्लवी कोरगावकर उपस्थित होते.

29 OCT 2026
पुढारी

शिवाजी विद्यापीठात उद्या विशेष व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

येथील ज्येष्ठ पत्रकार स्व. उदय कुलकर्णी यांच्या पत्रकारितेचा वेध घेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात शुक्रवारी (दि. ३०) ज्येष्ठ संपादक वासुदेव कुलकर्णी यांचे सकाळी ११ वाजता विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. कुलकर्णी यांच्या पत्रकारितेचा प्रवास, त्यांचे लेखन व पत्रकारितेतील योगदान यांची माहिती व्हावी, या उद्देशाने व्याख्यान होत आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

29 OCT 2026
पुढारी

संकल्प व्यसनमुक्तीचा अन् ध्यास विकसित भारताचा : राज्यपाल वर्मा

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

युवाशक्तीला योग्य दिशा, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि कौशल्यांची जोड दिल्यास विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकते. केवळ स्वतः सक्षम होऊन चालणार नाही, तर इतरांनाही सक्षम करण्याची जबाबदारी तरुणांनी स्वीकारली पाहिजे. चारित्र्यनिर्मिती, व्यसनमुक्ती, क्रीडासंस्कृती आणि राष्ट्राप्रति समर्पण या मूल्यांच्या आधारेच सशक्त भारताची उभारणी करता येईल, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाज आणि एस.जे.जे. ॲनालिटिकल लॅबोरेटरी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सशक्त युवा, सशक्त भारत' अभियानांतर्गत आयोजित 'नो ड्रग्ज' या सामाजिक उपक्रमाप्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून ते बोलत होते. यावेळी 'मविप्र'च्या तब्बल १ लाख २८ हजार ७५९ विद्यार्थ्यांनी



- १ लाख २८ हजार ७५९ विद्यार्थ्यांनी घेतली ड्रग्जपासून दूर राहण्याची शपथ

अमली पदार्थांपासून दूर राहण्याची शपथ घेत एक नवा विक्रम केला आहे. याप्रसंगी व्यासपीठावर पालकमंत्री गिरीश महाजन, न्यायाधीश मदन गोसावी, न्यायमूर्ती दिलीप घुमरे, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, 'मविप्र'चे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, एस.जे.जे. ॲनालिटिकल लॅबोरेटरीचे संचालक ॲड. महेश सावंत व माजी आमदार जयवंत जाधव होते.

29 OCT 2026
तरुण भारत

प्री-पीएच.डी. अभ्यासक्रम अर्ज करण्यासाठी वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या एम.फिल./प्री-पीएच.डी. अभ्यासक्रम आणि संशोधन व प्रकाशन नीतिशास्त्र (आरपीई) परीक्षांचे अर्ज भरण्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना विनाविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची अंतिम मुदत २ नोव्हेंबर आहे.

विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार एम.फिल./प्री-पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी १ हजार ३२५ रुपये, तर संशोधन व प्रकाशन नीतिशास्त्र (आरपीई) परीक्षेसाठी ६७५ रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. ३ नोव्हेंबर रोजी प्रतिपत्र ५० रुपये विलंब शुल्कासह, तर ४ नोव्हेंबर रोजी प्रतिपत्र ५० रुपये विलंब शुल्क आणि अतिरिक्त ३०० रुपये शुल्कासह अर्ज भरता येणार आहेत. ३ नोव्हेंबरपर्यंत विनाविलंब शुल्कासह, ४ नोव्हेंबर रोजी विलंब शुल्कासह आणि ५ नोव्हेंबर रोजी अतिरिक्त विलंब शुल्कासह शुल्क जमा करता येईल. परीक्षा अर्जांच्या याद्या विद्यापीठात जमा करण्याची अंतिम तारीख ६ नोव्हेंबर निश्चित करण्यात आली आहे. अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 OCT 2026

आरडर व्हयू

महात्मा फुले : कृतीशीलतेचे अग्रदूत

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे जीवनकार्य महाराष्ट्राच्या . समाजजीवनावर आणि एकूणच भारतीय सामाजिक विचारविश्वावर अत्यंत दूरगामी परिणाम करणारे ठरले. क्रांतीबा जोतीराव फ ुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण करताना हे प्रकर्षाने जाणवते की, फ ुले दाम्पत्य केवळ एका काळापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी नव्या युगाचा, नव्या सामाजिक जाणीवेचा आणि नव्या मानवतावादी मूल्यव्यवस्थेचा प्रारंभ केला. त्यांच्या कार्याचा गाभा बुद्धीप्रामाण्यवाद, कृतीशीलता आणि सामाजिक समतेवरील अढळ विश्वास हा होता.

महात्मा फुले यांनी सर्वप्रथम शब्दप्रामाण्यवादाला आणि ग्रंथप्रामाण्यवादाला ठाम नकार दिला. समाजात प्रचलित असलेल्या अंधश्रद्धा, कर्मकांडे, वर्णवर्चस्ववादी विचार आणि विषमतेच्या रचनेला त्यांनी केवळ वैचारिक विरोध केला नाही, तर त्याला पर्यायी सामाजिक कृतीशीलतेची जोड दिली. समतेच्या, बंधुत्वाच्या, धर्मनिरपेक्षतेच्या आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांना त्यांनी आपल्या कार्यातून मूर्त रूप दिले. आज आपण ज्या मूल्यांना संविधानिक मूल्ये म्हणतो, त्या मूल्यांचा हुंकार फुले यांनीच सर्वप्रथम भरला, असे म्हटले तर अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

फुले यांचा सामाजिक विचार केवळ भाषणापुरता किंवा लेखनापुरता मर्यादित नव्हता; त्याला सातत्याने कृतीची जोड होती. समाजातील विषमता, विशेषतः वर्णवर्चस्व आणि स्त्रीदमन, यांना उत्तर देण्यासाठी त्यांनी अनेक पावले उचलली. शिक्षण हे त्यांच्या कार्यातील सर्वात महत्त्वाचे आणि क्रांतिकारी साधन होते. मुलींची शाळा सुरू करणे, सावित्रीबाईंना शिक्षित करून त्यांना शिक्षक म्हणून घडवणे, आणि समाजाचा प्रखर विरोध सहन करत शिक्षणाची ज्योत प्रज्वलित ठेवणे, हे केवळ एका कुटुंबाचे कार्य नव्हते, तर एका नव्या युगांतराची सुरुवात होती. सावित्रीबाई फुले या पहिल्या मुख्याध्यापिका ठरल्या, आणि चार मुलींपासून सुरू झालेली शाळा पुढे अठ्ठेचाळीस मुलींवर पोहोचली. त्या मुली केवळ साक्षर झाल्या नाहीत, तर विचार करणाऱ्या, विवेकी बनल्या. हा शिक्षणप्रवाहच पुढे या देशातील सामाजिक परिवर्तनाचा पाया ठरला.

शिक्षणाबरोबरच महात्मा फुले यांनी सामाजिक अनिष्ट रूढी आणि प्रथांविरुद्धही ठाम भूमिका घेतली. केशवपनाच्या अमानवी प्रथेच्या विरोधात त्यांनी नाभिकांचा संप घडवून आणला. आज जरी त्या प्रथेची तीव्रता आपल्या समाजातून जवळजवळ नाहीशी झाली असली, तरी त्या काळात ही कृती अत्यंत क्रांतिकारी होती. ज्या लोकांचा रोजीरोटीचा व्यवसाय या प्रथेशी जोडलेला होता, त्यांनाही विश्वासात घेऊन, त्यांना अन्यायकारी प्रथेविरुद्ध उभे करणे हे फुल्यांच्या सामाजिक समंजसतेचे आणि व्यावहारिक बुद्धिमत्तेचे उत्कृष्ट उदाहरण होते.

विधवांचे दुःख, स्त्रियांवरील अन्याय, बालविधवांची केविलवाणी अवस्था, परित्यक्त स्त्रियांचे प्रश्न, या सगळ्या समस्यांकडे फुल्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने पाहिले. त्यांनी विधवा विवाहाचा विचार पुढे आणला. बालहत्या प्रतिबंधक गृहांची व्यवस्था उभी केली. ही सर्व कामे त्या काळच्या सामाजिक चौकटीला कडवे आव्हान देणारी होती. या समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीला शूद्रातिशूद्रांहूनही हीनतेची वागणूक देण्यात येत असे. त्याला उच्चवर्णीय, ब्राह्मण वर्गातील स्त्रियाही अपवाद नव्हत्या. त्यामुळे जात-धर्मनिरपेक्ष पद्धतीने फुले दांपत्याने महिलांच्या प्रश्नांना कृतीशील पद्धतीने वाचा फोडण्याचे काम केले तसेच त्यांच्यावरील अन्याय निवारणासाठी सर्वो तोपरी प्रयत्न केले. फुले यांनी विरोध हा कोणा व्यक्ती अगर जातीधर्म यांना नव्हता, तर विषमतेला जन्म देणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात त्यांनी संघर्ष आरंभला होता.

महात्मा फुले यांचा दृष्टिकोन समग्र आणि समावेशक होता. त्यांच्या मित्रपरिवारात भिडे, भांडारकर, चिपळूणकर, न्यायमूर्ती रानडे इत्यादी अनेक ब्राह्मण विचारवंत, सुधारक आणि सहकारी होते. यावरून त्यांचा संघर्ष कोणत्याही जातीविरुद्ध नव्हता, तर वर्चस्ववादी मानसिकतेविरुद्ध असल्याचे सिद्ध होते. ''ख्रिस्त, मांग, महंमद, ब्राह्मण'' यांना बंधुपरी हृदयाशी धरावे, असे म्हणणारा हा महामानव व्यक्तिगत द्वेषाने प्रेरित होता, असे म्हणणेच चुकीचे ठरेल. फुले अत्यंत समतावादी, उदार आणि मानवतावादी विचारांचे पुरस्कर्ते होते.

फुले यांचे लेखनही तितकेच क्रांतिकारी होते. लेखन, चिंतन, वाचन आणि मनन हे त्यांच्या कार्याचे अविभाज्य अंग होते. त्यांनी मराठी भाषेत समाजाला समजेल, भिडेल आणि विचार करायला भाग पाडेल, अशा भाषेत लेखन केले. 'गुलामगिरी' या ग्रंथातून त्यांनी समाजातील बौद्धिक गुलामगिरीचे, अज्ञानाचे आणि शोषणाचे तटस्थ पण सूक्ष्म आणि तीक्ष्ण विश्लेषण केले. हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील काळ्यां (निग्रो) लोकांच्या लढ्याला अर्पण केला,

–डॉ. आलोक जत्राटकर,
कोल्हापूर ८६९८९२८०८०

ही बाब त्यांच्या आंतरराष्ट्रीय समतेच्या जाणिवेची साक्ष आहे. जगभर जिथे जिथे शोषित लढत होते, तिथे तिथे फुले मनाने उभे होते. त्या सर्व लढ्यांशी आपले माणुसकीचे नाते जोडत होते. म्हणूनच पुढे नेल्सन मंडेला किंवा बराक ओबामा यांना भारत भेटीदरम्यान 'गुलामगिरी' या ग्रंथाची प्रत भेट म्हणून दिली गेली, तेव्हा या विचारांची विश्वात्मकता अधिक ठळकपणाने अधोरेखित झाली.

त्यांचे 'तृतीय रत्न' हे आधुनिक मराठीतील पहिले नाटक मानले जाते. 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथात शेतकऱ्यांचे दैन्य, सावकारी पाश आणि शेतीव्यवस्थेतील अन्याय यांचे सखोल विश्लेषण आढळते. म्हणूनच रामचंद्र गुहा यांनी फुले यांना आदराने The Radical Agrarian असे यथोचित संबोधले आहे. फुल्यांचे शेतकरीविषयक चिंतन केवळ सहानुभूतीपुरते नव्हते; ते व्यवस्थात्मक परिवर्तनाची मागणी करणारे होते.

फुल्यांच्या कार्यातील एक अत्यंत महत्त्वाचा, पण अनेकदा दुर्लक्षित राहणारा पैलू म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांविषयीचे त्यांचे कार्य. १८८० साली रायगडावर जाऊन शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढणे आणि शिवजयंती सुरू करणे हे त्यांचे राष्ट्रीय स्मृतीचे पुनरुज्जीवन करणारे कार्य होते. संभाजी महाराजांच्या काळानंतर सुमारे दीड-दोनशे वर्षे शिवराय विस्मरणात गेले होते. त्या पार्श्वभूमीवर फुल्यांनी शिवाजी महाराजांचा पहिला पोवाडा तथा काव्यमय चरित्र लिहून महाराष्ट्राला आपल्या सच्च्या स्वराज्यनायकाची नव्याने आठवण करून दिली. त्या अर्थाने महाराष्ट्रधर्म जागविणारे महात्मा फुले हे आद्य प्रवर्तकच म्हणायला हवेत. आज आपण जेव्हा जेव्हा शिवरायांचा अभिमानाने उद्घोष करतो, तेव्हा तेव्हा त्यासोबत महात्मा फुल्यांचेही स्मरण अनिवार्यपणे करायला हवे.

महात्मा फुले यांनी केवळ सामाजिक आणि वैचारिक क्षेत्रातच नव्हे, तर भौतिक बांधकामांमध्येही आपली कृतीशीलता सिद्ध केली. ते पुणे म्युनिसिपालिटीचे कमिशनर आणि बांधकाम ठेकेदारही होते. कात्रजचा जुना बोगदा, खडकवासला धरण, बंडगार्डन पूल अशी आजही भक्कम उभी असलेली कामे त्यांनी साकारली आहेत. त्यात भ्रष्टाचाराचा एकही ठिपका नव्हता. समाजाचा पैसा समाजासाठी वापरला गेला पाहिजे, ही त्यांची ठाम धारणा होती. बांधकाम कसे टिकाऊ, दर्जेदार आणि प्रामाणिक असावे, याची ही उदाहरणे त्यांनी जगाला उभी करून दाखविली आहेत.

फुल्यांच्या विचारविश्वात सत्यशोधक समाजाला विशेष स्थान आहे. हा समाज म्हणजे केवळ संघटना नव्हती, तर सत्याचा शोध घेणारी, विज्ञाननिष्ठा जपणारी आणि कर्मकांडांपासून समाजाला मुक्त करणारी चळवळ होती. फुले यांनी मांडलेली ''निर्मिक'' ही संकल्पना निसर्गाच्या निर्मितीक्षमतेला आणि नियंत्रणक्षमतेला मान्यता देणारी होती. सत्यधर्म म्हणजे माणुसकी, चांगुलपणा, सामाजिक बंधुभाव आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हीच त्यामागची व्यापक भूमिका होती.

महात्मा फुल्यांच्या समग्र कार्यातून जे फलित दिसते, ते म्हणजे समता, बंधुता, सौहार्द, मानवता आणि विवेक यांची ठाम पायाभरणी. राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जी विज्ञानवादी आणि सामाजिक न्यायाधिष्ठित परंपरा पुढे नेली, तिचे मूळ महात्मा फुले यांच्या कार्यात खोलवर रुजलेले आहे. म्हणून फुले यांचे स्मरण केवळ ऐतिहासिक आदरांजली म्हणून नव्हे, तर आपल्या वर्तमान सामाजिक जबाबदारीची जाणीव म्हणून करायला हवे.

महात्मा फुले हे एका व्यक्तीचे नाव नाही, तर या देशात उदयास आलेल्या सामाजिक क्रांतीचे, विवेकाच्या उजेडाचे, मानवमुक्तीच्या आणि समतेच्या लढ्याचे नाव आहे. त्यांच्या विचारांचा, कार्याचा आणि कृतीशीलतेचा वारसा आजही तितकाच प्रेरणादायी आहे. आपण समाजात न्याय, समता आणि मानवी मूल्यांचा आग्रह धरत असू, तर त्या प्रत्येक आग्रहामागे फुल्यांचे स्मरण असलेच पाहिजे. कारण महात्मा फुले केवळ भूतकाळातील सुधारक नव्हेत; तर आजच्या आणि उद्याच्याही सामाजिक परिवर्तनाच्या वाटचालीचे दिशादर्शक आहेत.

(लेखक फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारकार्याचे अभ्यासक आहेत.)

– संकलन